# नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

- संविधानाचे पालन करणे आणि तत्प्रणीत आदर्श व संस्था, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे.
- ज्यामुळे आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्यास स्फूर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शांची जोपासना करून त्यांचे अनुसरण करणे.
- भारताची सार्वभौमता, एकता व एकात्मता उन्नत राखणे व त्यांचे संरक्षण करणे
- आवाहन केले जाईल तेव्हा देशाचे संरक्षण करणे व राष्ट्रीय सेवा बजावणे.
- धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदाच्या पलीकडे जाऊन अखिल भारतीय जनतेमध्ये एकोपा व भ्रातृभाव वाढीला लावणे, स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा संविधानाचे पालन करणे आणि तत्प्रणीत आदर्श व संस्था, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे.
- ज्यामुळे आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्यलढयास स्फुर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शाची जोपासना करुन त्यांचे अनुसरुन करणे.
- भारताची सार्वभौमता, एकता व एकात्मता उन्नत राखणे व त्यांचे संरक्षण करणे
- आवाहन केले जाईल तेव्हा देशाचे संरक्षण करणे व राष्ट्रीय सेवा बजावणे.
- धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदाच्या पलीकडे जाऊन अखिल भारतीय जनतेमध्ये एकोपा व भ्रातृभाव वाढीला लावणे, स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाच्या प्रथा सोडून देणे.
- आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारसाचे मोल जाणून तो जतन करणे.
- अरण्ये, सरोवरे, नद्या व वन्य जीवसृष्टी या नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करून त्यात सुधारणा करणे आणि सजीव प्राण्याबाबत दयाबुध्दी बाळगणे.



- विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधकबुध्दी व सुधारणावाद यांचा विकास करणे.
- सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे.
- राष्ट्र सतत उपक्रम व सिध्दी यांच्या चढत्या श्रेणी गाठत जाईल अशाप्रकारे सर्व व्यक्तिगत व सामुदायिक कार्यक्षेत्रात पराकाष्ठेचे यश संपादन करण्यासाठी झटणे,
- हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य असेल..

**(स्त्रोत : भारताचे संविधान अनुच्छेद क्रमांक ५१-क मूलभुत कर्तव्ये )**



# जिल्हाधिकारी
# जालना

## संदेश

प्रशासनातील पारदर्शकता व संवेदनशिलता हा सुशासनाचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. पुरवठा विभागाच्या बाबतीत अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या बाबतीत शहरी व ग्रामीण जीवनाशी सतत संपर्क असलेल्या या विभागामार्फत सर्वसामान्य जनता व गोरगरीब जनतेसाठी त्यांच्या उदरनिर्वाहाचे आधार होणाऱ्या लोकोपयोगी योजनांची माहिती जनसामान्यांपर्यन्त पोचवून त्यांना आपल्या हक्काची व अधिकाराची जाणीव करून देण्यासाठी ही पुस्तिका तयार करण्यात आली आहे.

सर्वसामान्य भारतीय नागरिकाला खास प्रदान केलेल्या जीवनाच्या अधिकाराबाबतची अंमलबजावणी करण्यासाठी त्याला मिळणारे अन्न व पोषण हे त्याच्या मूलभूत गरजांपैकी सवात महत्त्वाचे आहे. अन्नाचा वाजवी दर, योग्य दर्जा व वेळेवर होणारा पुरवठा हे ध्येय अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या विविध योजनेमधून साध्य करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. राबविल्या जाणाऱ्या योजना, शासनाकडून मिळणारी आर्थिक व इतर मदत यासंबंधीची सपूर्ण माहिती या पुस्तिकेत आहे. त्यामुळे कार्यालयीन कामकाज पारदर्शी व गतिमान व अधिक कृतिशील होईल अशी माझी अपेक्षा आहे.

(तुकाराम मुंढे )





# जिल्हा पुरवठा अधिकारी
# जालना

## प्रास्ताविक

गोरगरीब जनतेला विविध जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणाऱ्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेत पारदर्शकता आणण्याच्या उद्‌देशाने व या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीत नागरिकांचा सहभाग वाढविण्याच्या उद्‌देशाने ही नागरी सनद प्रसिध्द करण्यात येत आहे.

जिल्ह्यातील शिधापत्रिकाधारक व समस्त नागरिकांना या विभागामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सुविधा विहित कालमर्यादेत उपलब्ध करून देण्याचा मनोदय या सनदेद्वारे सफल होईल अशी मला आशा वाटते.

(अविनाश रणखांब)

# विषयसूची


| अ.क्र. | विषय |
|---|---|
| | **भाग-१** |
| | **जालना जिल्ह्यातील विशेष उपक्रम** |
| १ | विभागाचे उद्दिष्ट व अंमलबजावणी<br>प्रस्तावना<br>अ) नवीन शिधापत्रिकांकरिता आकारण्यात येणारे दर<br>ब) नवीन शिधापत्रिकांसाठीचे निकष<br>क) आर्थिक मर्यादा<br>ड) कालमर्यादा<br>ई) तक्रार कोणाकडे करावी ? |
| २ | जीवनावश्यक वस्तूंची अनुज्ञेयता |
| ३ | सार्वजनिक वितरण व्यवस्था देखरेख दक्षता समित्या |
| ४ | नवीन शिधावाटप दुकान मंजुरीची कार्यप्रणाली<br>अ) नवीन दुकान मंजुरीसाठी जाहीरनामा प्रसिध्द करणे<br>ब) नवीन दुकान मंजूर करणे (कालमर्यादा )<br>क) परवाने देणारे प्राधिकारी व दाद मागण्यासाठी यंत्रणा |
| ५ | केरोसीन परवाना मंजूर करण्याची कार्यपध्दती<br>अ) तक्रार निवारण प्राधिकारी<br>ब) पुनरिक्षण /अपील<br>क) परवाना शुल्क तपशील |
| ६ | वैध मापनशास्त्र यंत्रणेमार्फत देण्यात येणाऱ्या सेवा |





| | |
|---|---|
| | भाग-२ |
| | (ग्राहक संरक्षण) |
| ७ | तक्रार निवारण्याची कार्यपध्दती<br>अ) नियमांच्या अंमलबजावणीमध्ये लोकप्रतिनिधी/संस्था/जनतेचा सहभाग<br>ब) नागरिकांच्या जबाबदाऱ्या<br>क) ग्राहकांचे हित संरक्षण/ हक्क<br>ड) तक्रार कोठे दाखल करावी याबाबत मार्गदर्शन<br>इ) तक्रार / अपिल यावर निर्णय घेण्याची कालमर्यादा<br>ई) ग्राहक तक्रार निवारण मंचाचे पत्ते |

## सार्वजनिक वितरण व्यवस्थेत करण्यात आलेल्या सुविधा

जालना जिल्ह्याच्या संकेतस्थळावर DSO Online ही संगणक प्रणाली सुरु करण्यात आली असून सदर संकेतस्थळावरुन जिल्ह्यातील कोणत्याही स्वस्त धान्य दुकानास किती धान्य दिले आहे हे सर्वसामान्य नागरिकांना पाहता येते. तसेच सदर प्रणालीच्या वापरामुळे जिल्ह्याचे पुरवठाविषयक लेखे सुध्दा लवकर तयार होत आहेत. केरोसीन वितरण व्यवस्थेमध्ये केरोसीन वितरणाचे परिमाणामध्ये समानीकरण करण्यात आले असून किरकोळ, हॉकर्स, अर्धघाऊक व घाऊक यांच्यात दरमहा फेरबदल करण्यात येत असल्यामुळे तक्रारीचे प्रमाण कमी झाले आहे. तसेच जिल्हयातील सर्व स्वस्त धान्य दुकानाच्या तपासणीचा एकत्रित कार्यक्रम काढल्यामुळे सहा महिन्यात सर्व दुकाने किमान एकदा तरी तपासली जात आहेत व त्यामुळे स्वस्त धान्य दुकानाच्या तक्रारी कमी झाल्या आहेत. याच संकेतस्थळावर PDS Jalna या आज्ञावलीव्दारे मोबाईल क्रमांकाची नोंदणी केल्यास आपल्या दुकानास कधी धान्य वितरित करण्यात आले याची माहिती संबंधित शिधापत्रिकाधारकास SMS व्दारे देण्यात येते. जिल्हयामध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे सामाजिक अंकेक्षण होण्याच्या दृष्टीने ग्राम पातळीवरील, तालुका पातळीवरील, नगरपालिका पातळीवरील व जिल्हा पातळीवरील पुरवठा दक्षता समिती प्रभावीरित्या कार्यान्वित करण्यात आली असून दरमहा नियमित होणाऱ्या बैठकीमध्ये सर्व पुरवठाविषयक बाबींचा आढावा घेण्यात येतो. पुरवठाविषयक पारित करण्यात आलेले सर्व आदेश, परिमाणे जिल्ह्याच्या संकेतस्थळावरती सर्वांना पाहण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत. तसेच पुरवठा विभागाची नागरिकांची सनद याच संकेतस्थळावर सर्व नागरिकांच्या माहितीसाठी प्रकाशित ठेवण्यात आली आहे.

जिल्हयातील सर्व गावांमध्ये तीन महिन्यांचे धान्य एकदाच देण्यासाठी द्वारवितरण योजना कार्यान्वित करण्यात आली असून यामध्ये ९०३ गावाचा समावेश असून स्वस्त धान्य दुकानदारांनी आपला सहभाग नोंदविला आहे.



## प्रस्तावना

**अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे उद्दिष्ट** - नित्य वापराच्या काही शिधा वस्तू स्वस्त दरात किंवा एका ठरावीक प्रमाणात जनतेला वाटप करण्यासाठी सार्वनजिक वितरण व्यवस्था छ नावाची योजना या विभागामार्फत राबविली जाते.

**या योजनेची अंमलबजावणी कोण करते ?**

**मंत्रालयीन स्तरावर -** या योजनेची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागावर आहे.

**जिल्हा स्तरावर -** जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली पुरवठा विभागाचे काम जिल्हा पुरवठा अधिकारी व त्यांचे कार्यालय पाहते.

**तालुका स्तरावर -** तहसीलदार यांच्या नियंत्रणाखाली पुरवठा शाखा हे काम पाहते. पुणे, नागपुर, सोलापुर अशा मोठ्या शहरांमध्ये तहसीलदारांच्या कार्यालयाऐवजी झोनल ऑफिसमधून पुरवठा विभाग हे काम पाहते.

**मुंबई, ठाणे शिधावाटप क्षेत्र -** नियंत्रक शिधावाटप, मुंबई यांच्या नियंत्रणाखालील विभागीय परिमंडळ कार्यालये व त्याखालील विविध शिधावाटप कार्यालयांमधून हे काम चालते.

शिधापत्रिकेवर प्रत्येक शिधापत्रिकाधारकांस एकुण ३५ किलो तांदूळ अथवा गहू याचे वितरण केले जाते.

वरील वस्तू प्राप्त करून घेण्यासाठी प्रत्येक कुटुंबाकडे शिधापत्रिका असणे आवश्यक आहे.

शिधापत्रिका मिळण्यासाठी शिधावाटप कार्यालय किंवा तहसील कार्यालयात विहित नमुन्यातील अर्ज २ रुपये किमतीला विकत मिळतो. नवीन शिधापत्रिका मिळणे, शिधापत्रिकेत नाव वाढवणे, नाव कमी करणे, शिधापत्रिका रद्द करणे,

हरविलेल्या / फाटलेल्या शिधापत्रिकांऐवजी दुय्यम शिधापत्रिका मिळणे, पत्त्यातील बदल अशा विविध कारणांसाठी अर्जाचे वेगवेगळे नमुने विहित केलेले आहेत.

**नवीन शिधापत्रिकेकरिता आकारण्यात येणारे दर**

| अ.क्र. | पुरवठा / शिधापत्रिकेचा प्रकार | दर (रुपये) |
|---|---|---|
| १ | नवीन पिवळी पुरवठा / शिधापत्रिका | १० |
| २ | नवीन केशरी पुरवठा / शिधापत्रिका | २० |
| ३ | नवीन शुभ्र पुरवठा / शिधापत्रिका | ५० |
| ४ | दुय्यम पिवळी पुरवठा / शिधापत्रिका | २० |
| ५ | दुय्यम केशरी पुरवठा / शिधापत्रिका | ४० |
| ६ | दुय्यम शुभ्र पुरवठा / शिधापत्रिका | १०० |
| ७ | शिधावाटप /पुरवठा कार्यालयातून दिले जाणारे विविध अर्जाचे नमुने (नमुना नंबर १ सह अर्जाचे सर्व नमुने ) | २ |

शुभ्र शिधापत्रिका तत्काळ पाहिजे असल्यास त्याकरिता रु. ५०० व केशरी शिधापत्रिका तत्काळ पाहिजे असल्यास रु. २०० एवढी रक्कम आकारण्यात येते.

शिधापत्रिका ही शासनाची मालमत्ता असल्यामुळे पुरवठा निरीक्षक किंवा इतर संबंधित अधिकारी मागणी करतील तेव्हा शिधापत्रिकाधारकाने त्यांना शिधापत्रिका दाखविली पाहिजे. शिधापत्रिका देताना संबंधित कुटुंब / व्यक्ती त्या क्षेत्रातील अर्जात नमूद केलेल्या पत्त्यावर प्रत्यक्ष राहतात किंवा कसे व त्यांचे नाव इतर शिधापत्रिकेत नाही तसेच त्याची याव्यतिरिक्त इतरत्र शिधापत्रिका नाही हे पाहिले जाते. **कोणत्याही व्यक्तीने एकापेक्षा अधिक शिधापत्रिका मिळविणे किंवा एकापेक्षा अधिक शिधापत्रिकेत नाव समाविष्ट करणे हा गुन्हा आहे.**



**नवीन शिधापत्रिकांसाठी निकष**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरण करण्यात येणाऱ्या शिधावस्तू प्राप्त करून घेण्यासाठी शिधापत्रिकेची आवश्यकता असते. या व्यवस्थेअंतर्गत कोणत्याही भारतीय नागरिकाला त्याच्याजवळ पूर्वीची शिधापत्रिका रद्द केल्याचा पुरावा असल्यास नवीन शिधापत्रिका देण्यात येते. सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरीत होणाऱ्या शिधावस्तू समाजातील **दुर्बल घटकांना प्राधान्याने व कमी दराने** मिळाव्यात याकरिता राज्यात सध्या तीन प्रकारच्या शिधापत्रिका देण्यात येत आहेत. दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना पिवळया रंगाच्या, **दारिद्रयरेषेवरील** कुटुंबाना केशरी रंगाच्या व सधन वर्गाला शुभ्र रंगाच्या शिधापत्रिका पुढील निकषांच्या आधारे देण्यात येत आहेत.

**आर्थिक मर्यादा**

**(अ) पिवळया शिधापत्रिकांसाठी निकष.**
कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. १५००० पर्यंत असले पाहिजेत.

**(ब) केशरी शिधापत्रिकेसाठी निकष.**

(एक) कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रुपये १ लक्ष किंवा त्यापेक्षा जास्त नसावे.

(दोन) कुटुंबातील कोणाही व्यक्तीकडे चारचाकी यांत्रिक वाहन नसावे. (टॅक्सी चालक वगळून)

(तीन) कुटुंबातील सर्व व्यक्तींच्या नावे मिळून चार हेक्टर किंवा त्यापेक्षा जास्त बारमाही बागायती शेतजमीन असू नये.

**(क) शुभ्र शिधापत्रिकांसाठी निकष.**

ज्या कुटुंबातील सर्व व्यक्तीं मिळून एकत्रित वार्षिक उत्पन्न रुपये १ लक्ष किंवा त्यापेक्षा जास्त असेल किंवा त्या कुटुंबातील कोणाही व्यक्तीकडे चारचाकी यांत्रिक वाहन असेल किंवा त्या कुटुंबातील सर्व व्यक्तीच्या नावे मिळून चार हेक्टरपेक्षा जास्त बारमाही बागायती शेतजमीन असेल अशा कुटुंबाना शुभ्र शिधापत्रिका देण्यात येत आहेत.

## कामे पूर्ण करण्यासाठी कालामर्यादा

या शिधापत्रिकांसबंधीची नागरिकांची कामे तहसील पुरवठा शाखेतून पूर्ण करण्यासाठी खालीलप्रमाणे कालमर्यादा विहित करण्यात आली

| न. | कामाचे स्वरुप (१) | कालमर्यादा (२) |
|---|---|---|
| १. | नवीन शिधापत्रिका देणे (राज्यांतर्गत बदल व पुरावा असल्यास) | ७ दिवस |
| २. | इतर राज्यातून आलेल्या अर्जदारास नवीन तात्पुरती शिधापत्रिका देणे | १५ दिवस |
| ३. | शिधापत्रिकेत नाव वाढविणे. | ७ दिवस |
| ४. | शिधापत्रिकेत नवीन जन्मलेल्या मुलाचे नाव वाढविणे. ( जन्म दाखल्यासह) | १ दिवस |
| ५. | शिधापत्रिकेत नोंद असलेल्या लहान मुलांचे एकांक वाढविणे. | १ दिवस |
| ६. | हरवलेल्या शिधापत्रिकेऐवजी दुय्यम शिधापत्रिका देणे. | १० दिवस |
| ७. | फाटलेल्या / खराब झालेल्या शिधापत्रिकेऐवजी दुय्यम शिधापत्रिका देणे. | ३ दिवस |
| ८. | शिधापत्रिकेवरील पत्त्यातील बदल (त्याच रास्त भाव दुकानाच्या व तहसील कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात). | ७ दिवस |
| ९. | शिधापत्रिकेवरील पत्त्यातील बदल. (तहसील कार्यालयात बदल असल्यास). | **नवीन तहसील कार्यालयात अर्ज व जुनी शिधापत्रिका दिल्यापासून ७ दिवस** |
| १०. | शिधापत्रिकेतील नाव कमी करणे व तसे प्रमाणपत्र देणे | १ दिवस |
| ११. | शिधापत्रिका रद्द करून तसे प्रमाणपत्र देणे | १ दिवस |



शिधापत्रिकेवर ६ वर्षाखालील मुलाला १ एकांक व ६ वर्षावरील व्यक्तीस २ एकांके समजण्यात येतात.

## तक्रार कोणाकडे करावी ?

शिधावाटप दुकान /शिधापत्रिका/शिधावस्तू याबाबतच्या तक्रारी संबंधित तहसीलदार/शिधावाटप अधिकारी यांच्याकडे कराव्यात; तथापि त्यांनी दखल न घेतल्यास तसेच शिधावाटप दुकानांची अधिक आवश्यकता / धान्याचा कोटा कमी मिळणे याबाबतच्या तक्रारी खालील तक्त्यातील दिलेल्या अधिकाऱ्यांकडे कराव्यात.

| अ.क्र. | क्षेत्र | कामकाजासाठी सक्षम प्राधिकारी | तक्रार करण्यासाठी प्राधिकारी |
|---|---|---|---|
| १ | जालना | जिल्हा पुरवठा अधिकारी | जिल्हाधिकारी |
| | | उपविभागीय अधिकारी | जिल्हाधिकारी |
| | | तहसीलदार | जिल्हाधिकारी |

## २. जीवनावश्यक वस्तूंची अनुज्ञेयता

### शिधावस्तू व वितरण परिमाण

| शिधावस्तूंचे नाव | परिमाण |
|---|---|
| **(१) गहू** | पिवळ्या शिधापत्रिकाधारक |
| **(२) तादूंळ** | **(१) अंत्योदय**<br>दरमहा ३५ किलो धान्य, गहू व तांदूळ मिळून. गहू रुपये २ प्रति किलो या दराने व तांदूळ रुपये ३ प्रति किलो या दराने.<br>**(२) बिगर अंत्योदय**<br>दरमहा ३५ किलो धान्य, गहू व तांदूळ मिळून. गहू रुपये ५ प्रति किलो या दराने व तांदूळ रुपये ६ प्रति किलो या दराने.<br>**केशरी शिधापत्रिकाधारक** - दरमहा १५ किलो धान्य, गहू व तांदूळ मिळून. गहू रुपये ७.२० प्रति किलो या दराने व तांदूळ रुपये ९.६० प्रति किलो या दराने.<br>***शुभ्र शिधापत्रिकाधारक कुटुंबे.- धान्य पुरवठ्यातून वगळण्यात आली आहेत.** |